MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अजितदादा पवार यांचा डॉ.योगेश क्षीरसागरांकडून सत्कार

बीड (प्रतिनिधी)

शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड झाली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सत्कार केला.बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्यावतीने अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले. त्यांचा प्रशासनातील दांडगा अनुभव व कणखरपणा बीड जिल्ह्याला प्रगतीपथावर घेवून जाण्यास नक्की मदत करेल, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१२४ | रविवार दि.१९ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -124 | SUNDAY DT.19 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सर्दी गेली अन पडसं आलं

## असं म्हणायची वेळ आता बीडकरांवर अजित पवार बीडचे पालकमंत्री म्हणजे धनंजय मुंडे यांची ताकद वाढली

**आ. सुरेश धस आ. संदीप क्षीरसागर आ. प्रकाश सोळंके यांना आता उपमु अजित पवार समोर हात जोडावे लागतील आ. प्रकाश सोळंके. सुरेश धस यांनी आ. धनंजय मुंडे ला केलेला विरोध म्हणजे अजित दादांच्या राष्ट्रवादीला विरोध**





### अजित पवारला बीडचं पालकमंत्री पद देऊन पुन्हा जिल्ह्याचा विकासाला ब्रेक

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये वंजारा मराठी वादामध्ये बीडच्या राजकारण हे बरं असतं आपलं जातीच्या राजकारणावर मुद्द्यावर आले मुद्द्यावरून मुद्द्यावर हे आले नव्याने स्थापन झालेले अजित पवारांच्या राष्ट्रवादीला भाजपचे आमदार सुरेश धस व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळके यांनी धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांना विरोध करण्याची ठरवले परंतु याच विरोधातून आता बीडचा विकास कुठेतरी थांबलाय असे बीडकरांना वाटत आहे त्यामुळे सर्दी गेली आणि पडसं आलं असंच म्हणण्याची वेळ आता बीड वाल्यांवरती आल्या आहे तर पंकजा मुंडे धनंजय मुंडे ह्याच बीडचे पालकमंत्री असते तर त्यांनी नक्कीच विकासासाठी निधी खेचून आणला असता अजित पवारांना भेटायचा म्हणलं की महिना पंधरा दिवसाची वेळ घ्यावा लागते अजित पवारांना डायरेक्ट जो भेटेल त्याचं काम कधीच होत नाही अजित पवारांची वेळ घेऊन भेटण्या अगोदर आता बीड करांना वाट पाहावी लागेल अजित दादा कधी बोलवतात आणि बीडचा विकास कधी होतो त्यात डीबीटीसी च्या बैठकीमध्ये सुद्धा अजित पवार हे आता विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर सुरेश धस प्रकाश सोळंके यांना मात्र आता गाडीची किंमत देणार नाहीत यामध्ये तीळ मात्र शंका नाही तर धनंजय मुंडे यांची ताकद अजित पवारांच्या बीडच्या पालकमंत्री पदामुळे वाढली म्हणायला हरकत नाही

### आ. विजयसिंह पंडित व डॉ योगेश क्षीरसागर यांची चांदीच चांदी

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आता उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडचे पालकमंत्री झाले आहेत आता खरी वास्तव स्थिती पाहता पाहायला मिळणार आहे कारण गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांना भरघोस निधी मिळणार आहे तसेच बीडचे विधानसभेचे अध्यक्ष डॉक्टर योगेश क्षीरसागर यांना भरपस निधी मिळणार आहे कारण आता विजयसिंह पंडित व योगेश क्षीरसागर यांची चांदी झाल्याची चर्चा बीडच्या नागरिकांमधून ऐकायला मिळत आहे कारण अजित पवारांचे निकटवर्ती आम्हास एक पंडित हे सध्याच्या मराठा वंजारावादामध्ये व स्वर्गीय संतोष देशमुख हत्या प्रकरण असेल किंवा कोणताही वाद असेल यामध्ये ते पडलेले नाहीत त्यामुळे अमरसिंह पंडित व योगेश क्षीरसागर यांची आता विकासासाठी बीड जिल्ह्याला गरज आहे आणि त्यांनी अजित पवारांकडून विकास करून व निधी बीडकरांना घेऊन दिला पाहिजे अशी चर्चा नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे


# भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनी सकाळी ९.१५ वाजता मुख्य शासकीय समारंभ

## जिल्हानिहाय ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची यादी जाहीर
## बीडचे मुख्य शासकीय ध्वजारोहण क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते

मुंबई ।प्रतिनिधी

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असे राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

मुंबई येथील मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल यांच्या हस्ते व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क दादर मुंबई येथे ध्वजारोहण व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल. विभागीय आणि जिल्हा स्तरावर पुढे दर्शविल्याप्रमाणे मंत्री अथवा राज्यमंत्री ध्वजारोहण करतील.ठाणे - उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, पुणे - उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार, नागपूर - मंत्री सर्वश्री चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अहिल्यानगर - राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील, वाशिम - हसन सकीना मियालाल मुश्रीफ, सांगली - चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील, नाशिक- गिरीश गीता दत्तात्रय महाजन,पालघर- गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक, जळगाव- गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील, यवतमाळ- संजय प्रमिला दुलीचंद राठोड, मुंबई शहर- मंगलप्रभात प्रेमकवर गुमनमल लोढा, मुंबई उपनगर- ड.आशिष मीनल बाबाजी



शेलार, रत्नागिरी- उदय स्वरूपा रवींद्र सामंत, धुळे- जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, जालना- श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, नांदेड- अतुल लीलावती मोरेश्वर सावे, चंद्रपूर- अशोक जनाबाई रामाजी उईके, सातारा- शंभुराज विजया देवी शिवाजीराव देसाई, बीड- दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे, रायगड- आदिती वरदा सुनील तटकरे, लातूर- शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले, नंदुरबार- ङ माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे, सोलापूर- जयकुमार कमल भगवानराव गोरे, हिंगोली- नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ, भंडारा- संजय सुशीला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव- प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, बुलढाणा- मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील), सिंधुदुर्ग- नितेश नीलम नारायण राणे, अकोला- आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर, गोंदिया- बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील, कोल्हापूर- प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर, गडचिरोली- ड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल, वर्धा- पंकज कांचन राजेश भोयर, परभणी- श्रीमती मेघना दीपक साकोरे - बोर्डीकर अमरावती- इंद्रनील अनिता मनोहर नाईक.राष्ट्रध्वजारोहण करणारे मंत्री अथवा राज्यमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी तसेच इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी ध्वजारोहण करतील. संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजारोहण समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.



अहिल्या नगर येथील आ, संग्राम भैय्या जगताप यांनी पिंपरी घाटा येथील दत्त हास्पीटलचे डॉ बाळासाहेब गिऱ्ये यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देली यावेळी भैय्या यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला कोरोना महामारीच्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता डॉ बाळासाहेब गिऱ्ये यांनी रूग्णांवर उपचार केले होते या वेळी अतुल जवणे अदि उपस्थित होते

छायाचित्र,( सुरेश कांबळे आष्टी)




## एकता मराठी साहित्य संमेलनात रंगले बालगोपाळांचे कथाकथन

### वि.भा.साळुंके सत्राचे अध्यक्ष

**शिरूर कासार(प्रशांत बाफना) (राष्ट्रसंत भगवानबाबा साहित्य नगरी) : एकता फाउंडेशन शिरूर कासार (महाराष्ट्र राज्य), साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सातवे एकता मराठी साहित्य संमेलन दहिवंडीतील महात्मा फुले विद्यालयात प्राचार्या डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात नुकतेच पार पडले. संमेलनाच्या दुसर्या दिवशी (१८ जानेवारी) दुपारी ११:३० ते १ यावेळेत कडा ता.आष्टी येथील सुप्रसिद्ध कथाकार तथा निवेदक वि.भा.साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन संपन्न झाले.**

यशवंत होळकर विद्यालयाची विद्यार्थीनी सानिका गुजर हिने 'चिमटा' ही आई व मुलाच्या गहिऱ्या नात्यावर प्रकाश टाकणारी कथा सांगून उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणले. होळकर विद्यालयाची कु.संध्या नेटके हिने 'बाप' ही वेगळ्या धाटणीची कथा सादर करून श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले. याच विद्यालयाची कु.कार्तिकी नेटके हिच्या 'स्पर्धा' या सत्यकथेने प्रेक्षकांना भारावून टाकले. 'कष्ट' ही कथा सादर करून दहिफळे वस्ती शाळेची विद्यार्थीनी ऋतुजा केदार हिने सर्वांना मंत्रमुग्ध केले. याच शाळेची विद्यार्थीनी भार्गवी तुपे हिने 'मोबाईल' ही मोबाईलच्या दुष्परिणामांवर आधारित कथा पेश करून चांगला संदेश दिला. कार्तिकी अनाप हिने 'पर्यावरण' ही सध्याच्या ज्वलंत सामाजिक विषयावरील कथा सादर करत रसिकांना भविष्यातील धोक्यांची जाणीव करून दिली. दहिफळे वस्ती शाळेचाच विद्यार्थी शिवम मानूरकर याची 'व्यथा' ही भावगर्भ कथा ऐकून सभामंडप भारावून गेला तर भागवत बडे याने 'कृतज्ञता' ही कथा सादर करून वातावरणात गंभीरता आणली.

यावेळी संमेलनाध्यक्षा प्राचार्या डॉ.दिपाताई क्षीरसागर, एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, संमेलनाच्या स्वागताध्यक्षा तथा एकताच्या सल्लागार एड.भाग्यश्री ढाकणे, महात्मा फुले विद्यालयाचे प्राचार्य बाबुराव जायभाये, जगदीश चेमटे, डॉ.बाळासाहेब सानप, फौजी कैलास खेडकर, देवीदास शिंदे यांनी श्रोत्यांमध्ये बसून कथाकथन सत्राचा आनंद घेतला. मुलांच्या कथाकथनावर खुश होत संमेलनाध्यक्षा डॉ.क्षीरसागर यांनी प्रत्येक बालकथाकाराला रोख बक्षीसही दिले.

# पुरुषोत्तमपुरी येथे कर्मवीर ॲड.एकनाथ आव्हाड यांना जयंतीनिमित्त अभिवादन

## वंचित, शोषित, उपेक्षितांना न्याय देण्याचं काम ॲड.एकनाथ आव्हाड यांनी केले

माजलगाव, सुनिल थोरात

पुरुषोत्तम पुरी या ठिकाणी कर्मवीर ड.एकनाथ आव्हाड यांच्या जयंतीनिमित्त सर्व समाज बांधवांकडून अभिवादन करण्यात आले.दि.१९ जानेवारी या दिवशी कर्मवीर एकनाथ आव्हाड जिजा यांची जयंती असते. या दिवशी विविध ठिकाणी अभिवादनाचे कार्यक्रमा आयोजित केले जातात. कर्मवीर एकनाथ आव्हाड यांनी दलित शोषित पीडित वंचित उपेक्षित यांना न्याय देण्याचं काम केलेलं आहे तसेच समाजामध्ये फुले शाहू आंबेडकर चळवळ ही घराघरांमध्ये नेऊन पोहोचवली आहे व समाजामध्ये स्वाभिमान जागा केलेला आहे तसेच ज्यांना जमीन नाही त्यांना गायरान मिळवून दिले व गायरानाच्या माध्यमातून त्यांची उपजीविका भागेल या हेतूने हजारो



एकर गायरान जमिनी गायरान धारकांना कसायला लावल्या आज त्या जमिनी संबंधित गायरानधारकांच्या नावे पण होत आहेत गायरान धारकांच्या लढ्यात एकनाथ आव्हाड यांचं मोलाचे योगदान आहे. कर्मवीर ड.एकनाथ आव्हाड यांनी समाजामध्ये अशी मागणी केली की तुमच्या लेकरांना शिक्षण द्या शिक्षणाशिवाय प्रगती नाही व समाजाचा विकास हा शिक्षणातूनच होतो असे सांगितले. अशा अनेक गोष्टी एकनाथ आव्हाड यांनी समाजाला सांगितल्या व समाजाला योग्य दिशेने नेण्याचे काम केले. आज त्यांची जयंती या जयंतीनिमित्ताने पुरुषोत्तम पुरी येथे मोठ्या संख्येने समाज बांधवांनी कर्मवीर एकनाथ आव्हाड यांना अभिवादन केले व मानवी हक्क अभियान या संघटनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण माजी उपसरपंच रघुपत शेळके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी सरपंच महादेव थोरात, माजी उपसरपंच श्रावण थोरात, मानवी हक्क अभियानाचे तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब थोरात, धर्मा मोरे, प्रकाश थोरात, नारायण लोखंडे, प्रभाकर गायकवाड, दीपक मोरे, बालाजी लोखंडे, लक्ष्मण खंडागळे, बळीराम मोरे, राजेभाऊ लोखंडे, भैय्या मोरे, दादा पवार, अमोल मोरे, पत्रकार आकाश लोखंडे सह समाज बांधव उपस्थित होते.

# कौडगाव घोडा च्या शाळेची विद्यार्थीनी ऐश्वर्या खरात वक्तृत्व स्पर्धेत प्रथम



परळी : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त श्रीनाथ मानव सेवा मंडळ संचलित पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय येथे विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग ७ वीची विद्यार्थीनी कु . ऐश्वर्या खरात प्रथम आली आहे. 'होय मि शेतकरी बोलतोय' हा विषय वक्तृत्व स्पर्धेचा होता . शेतकऱ्यां बद्दल व्यक्त होतांना कु . ऐश्वर्या आपल्या भाषणात म्हणाली कि ,शेतकरी ग्राहका पासुन व्यापाऱ्यां पर्यंत आणी दलाला पासुन ते सरकारी धोरणा पर्यंत कसा भरडला जातो याचे वास्तव्य मांडले. सदरील वक्तृत्व स्पर्धेत परिसरातील विविध शाळांनी सहभाग नोंदवला होता . अनेक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. यात कु. ऐश्वर्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे . या बद्दल पापनाथेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष एकनाथराव मुंडे व मुख्याध्यापीका सुलेखा मुंडे यांच्या हस्ते कु . ऐश्वर्या व इतर उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र , स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला . कु.ऐश्वर्या हिच्या यशा बद्दल तिचे व मार्गदर्शक शिक्षक भोकरे सरांचे मुख्याध्यापक श्री. सुभाष सोळंके सर , खिंडरे सर , पुरी सर,नाईक सर,शेख सर,हाके हर,आचार्य सर ,शिंदे सर व शालेय व्यावस्थापन समिती अध्यक्ष शिवराज फपाळ उपाध्यक्ष श्रीमती शितल रमेश सोलंकर व सर्व शालेय व्यावस्थापन सदस्यांनी अभिनंदन केले .

# नव उद्योजक महिलांचा एस समीटला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई:युथ ऐड फाउंडेशन, पुणे, सेवा इंटरनॅशनल दिल्ली, ग्राम ऊर्जा ह्यूमन डेव्हलोपमेंट फाऊंडेशन आणि सृजन ॲग्रो टेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता एस समिट २०२५ कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. बिड जिल्ह्यात प्रथमच अंबाजोगाई येथील या कार्यक्रमात महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या संकल्पना आणि सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रगतशील महिला शेतकरी विद्या रुद्राक्ष, प्रसाद सिरशीकर (सेवा इंटरनॅशनल दिल्ली), दादासाहेब गायकवाड (अध्यक्ष, ग्राम ऊर्जा फाऊंडेशन,



अंबाजोगाई) आणि सौ. रोहिणी भरड (शास्त्रज्ञ, केव्हीके) उपस्थित होते. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील महिलांसाठी उद्योजकतेच्या संधी, सामाजिक संस्थांचा सहभाग आणि उद्योजकतेशी संबंधित मार्गदर्शन केले.

एस समिटमध्ये उत्कृष्ट व्यवसाय संकल्पना सादर करणाऱ्या महिलांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच, उद्योगाशी संबंधित विविध बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले, ज्यात उद्योगासाठी भांडवल मिळविण्याच्या उपलब्धतेसंबंधी तसेच ऑनलाइन उत्पादन विक्री संदर्भात महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमाच्या अंतर्गत, स्टॉलधारक महिलांनी विविध खाद्यपदार्थ, कलाकुसरीच्या वस्तू आणि इतर उत्पादने प्रदर्शित केली, ज्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. १११ ग्रामीण महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला, तर ३८ महिलांनी त्यांच्या व्यवसाय विषयक संकल्पना सादर केल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुजा घाडगे आणि शामल माळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्रामऊर्जा संस्थेचे अशोक हातागळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्राम ऊर्जा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी

# युसूफ वडगाव पोलीसांची कामगिरी

दिनांक १८/०१/२०२५ रोजी युसुफ वडगाव पोलीस ठाणे हद्दीत मौजे बनसारोळा येथे एका बोलेरो जीप मधून टँगो संत्रा दारूची वाहतूक होत असल्याबाबत माहिती मिळाली होती. सदर माहितीवरून युसुफ वडगाव पोलिसांनी सदर जीपची तपासणी केली असता सदर जीपमध्ये १७,५००/- किमतीची टँगो संत्रा देशी दारू अवैधपणे वाहतूक करत असताना चैतन्य बाबासाहेब रांजणकर, रा. युसूफ वडगाव हा मिळून आला. त्याच्यावरती युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करून अवैध पद्धतीने विकली जाणारी दारू व दारू वाहतुकीसाठी वापरली गेलेली बोलेरो जीप असा एकूण २,१७,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच पोउनि बसवेश्वर चनशेट्टी व इतर अंमलदार हे युसुफ वडगांव पोलिस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना आवसगाव शिवारात केलेल्या वाहन तपासणी मध्ये मुजफ्फर गफार तांबोळी,



रा. केज हा त्याचेकडील स्विफ्ट डिझायर गाडीत विमल, बाओबाजी, गोवा, आरएमडी असा १२५८५/- रू. किंमतीचा प्रतिबंधीत गुटखा विक्री साठी वाहतूक करताना आढळून आला. सदर इसमास २,१२,२८५/- रू चे मुद्देमाल व कारसह घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली युसूफ वडगाव पोलीस ठाण्याचे सपोनी मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोउपनि बसवेश्वर चनशेट्टी, पोलीस शिपाई बालासाहेब घोरपडे, पोलिस शिपाई नितीन अतकरे पोलीस शिपाई महादेव केदार, चालक पोलीस शिपाई सादीक आतार यांच्या पथकाने केली आहे.

# अंभोरा पोलिसांच्या कामगिरीचे पोलीस अधीक्षकांकडून कौतुक

## ठाण्यात जाऊन एस पी चे अंभोरा पोलिसांना रिवार्ड

सुरेश कांबळे
आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बीड व अहिल्यानगर या सरहद्दीवर असलेले ग्रामीण भागातील पोलीस स्टेशन म्हणजे अंभोरा पोलीस ठाणे या पोलीस ठाण्यात डोंगर दऱ्याच्या गावाचा समावेश होतो या सर्व गावाची कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी येथील अधिकारी व पोलीस अहोरात्र परिश्रम घेत असतात आंभोरा पोलीस ठाण्या अंतर्गत अवैध धंदे विरोधात तर मोहीमच राबवून अवैध धंदे वाल्यांचे चांगले धावे दणाणले होते अंभोरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी सतत तत्पर असतात याचेच एक ज्वलंत उदाहरण आष्टी तालुक्यातील आंभोरा पोलीस ठाणे हद्दीत आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे गुरुवारी रात्री वाहिरा येथे दुहेरी हत्याकांड झाले आणि जिल्हा हादरला परंतु हे हत्याकांड झाल्याची घटना घडली याची माहिती अंभोरा पोलिसांनी मिळतच अंभोरा पोलीस ठाण्याचे चे अधिकारी व कर्मचारी पथक घटनास्थळी तत्काळ दाखल



होऊन दुहेरी हत्याकांडातील संशयित सात आरोपींना काही तासातच जेरबंद केले व कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जीवाची रान केले गुरुवारी रात्री घटना घडल्यानंतर अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे व त्यांच्या टीमने पाठलाग करून आरोपींना अटक केली या त्यांच्या कामगिरीची कौतुक बीड पोलीस अध्यक्ष नवनीत कावत साहेब ,यांनी शनिवारी पोलीस ठाण्यात भेट दिली व या कामगिरीबद्दल अंभोरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना रिवार्ड ,व प्रशिस्तीपत्र दिले यावेळी अंभोरा ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे ,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे ,व पोलीस कर्मचारी उपस्थित होते

# नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा धारूर मधील दोन्ही परीक्षा केंद्रावर शांततेत सुरळीत संपन्न

धारूर / प्रतिनिधि

केंद्रीय नवोदय विद्यालया सहावी वर्गा साठी प्रवेश पुर्व परीक्षा धारूर शहरात दोन केंद्रावर संपन्न झाली ७१४ पैकी ६८५विद्यार्थ्यानी परीक्षेस उपस्थीती लावली २९ जन गैरहजर राहीले सुरळीत व कडक बद्रोबस्तात परीक्षा पार पडली.नवोदय विद्यालयाची प्रवेश पूर्व परीक्षा दिनांक १८ जानैवारी रोजी धारूर शहरात दोन परीक्षा केंद्रा वर राजमाता जिजाऊ महाविद्यालय किल्ले धारूर तसेच जिल्हा परिषद माध्यमीक शाळा किल्ले धारूर या ठिकाणी घेण्यात आली या परीक्षेला काहीही गालबोट न लागता कडे कोट पोलीस बंदोबस्तामध्ये सुरळीतपणे व शांततेत पार पडली. नवोदय प्रवेश परीक्षा साठी विद्यार्थ्यांची उपस्थिती देखील चांगली दिसून आली. विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षा पेपर शांततेने दोन्हीही सेंटरवर परीक्षा पार पडली. जिल्हा परिषद माध्यमीक शाळा या सेंटरवर एकूण ३१२ विद्यार्थ्यापैकी ३०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर राजमाता जिजाऊ महाविद्यालय या ठिकाणी ४०२ विद्यार्थ्यांपैकी ३८५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे व इतर अधीका-यानी दोन्ही केंद्राला भेट दिल्या

राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर या ठिकाणी



केंद्र पर्यवेक्षक म्हणून केंद्रप्रमूख सय्यद हकीम यांनी काम पाहिले तर जिल्हा परिषद माध्यमीक शाळा किल्ले धारूर या ठिकाणी मुख्याध्यापक गणेश आकुस्कर यांनी काम पाहिले. सर्व शिक्षक कर्मचारी यांनी देखील परिवेक्षकाचे काम उत्तम प्रकारे पार पाडले

# दर रविवारी कृषी दुकाने बंद

## वडवणी तालुका कृषी असोसिएशनचा निर्णय

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व कृषी साहित्य विक्रेत्यांनी आज पासून प्रत्येक आठवड्यातून एक दिवस १५ जानेवारी ते १५ मे पर्यंत प्रत्येक रविवारी दुकान बंद ठेवण्याचा निर्णय वडवणी तालुका कृषी असोसिएशन ने घेतला आहे.वडवणी तालुक्यातील कृषी व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.वडवणी तालुक्यातील लहान-मोठे एकही कृषी दुकान रविवारी सुरू राहणार नाही, असा ठराव या बैठकीत करण्यात आला.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण आपल्याला आगोदर एक जिवंत माणूस आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. तरच आपल्याला आरोग्य धनसंपदा कळली आहे असे म्हणता येईल. माणसाच्या जीवनात पैसा हाच सर्वस्व नसतो त्या पलीकडे हि काही माणसाचं वैयक्तिक जिवन असतं खरं पाहिलं तर व्यापाऱ्यासारखा सतत कामातच गुंतणार दुसरा वर्ग नाही, मग तो व्यापारी कशाचा का असेना. शेतकऱ्यांना तरी वापसा मोडला म्हणून का होईना सुट्टी मिळते पण व्यापाऱ्याचा मात्र



कधीच वापसा मोडत नाही. नोकरदारांना पण आठवड्याला सुट्टी मिळते.ते लोकं सुट्टी दिवशी स्वत:ला वेळ देतात,कुटुंबाला वेळ देतात.काही आवडी-निवडी चे कामं करतात या धावपळीच्या जिवनातून एक दिवस का होईना पण ते रिलॅक्स होतात. त्यामुळे एक दिवस सुट्टीचा निर्णय सर्व कृषी व्यापाऱ्यांनी घेतला आहे.वडवणी तालुक्यातील सर्व ग्रामीण मधील व शहरांमधील दुकानदारांनी आप-आपली कृषी दुकान प्रत्येक रविवारी बंद ठेऊन वडवणी तालुका कृषी असोसिएशन ला सहकार्य करावे

# सांगा डॉ. अशोक थोरात साहेब

## गर्भवती महिला, बाह्यरुग्ण आणि नातेवाईकांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कुठे ? जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे :- डॉ.गणेश ढवळे

बीड:बीड जिल्हा रूग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे लागले असून सोनोग्राफी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला तसेच जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल रूग्णांना भेटण्यासाठी आलेले नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक असा जिल्हा रुग्णालयात रोज हजारों लोकांचा राबता असतो .मात्र जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी कोठे जायचे असा प्रश्न असुन एकवेळ पुरूष समोरच्या पार्किंगच्या जागेत लघुशंकेसाठी जाऊ शकतात मात्र महिलांची शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत असुन महिलांची हेळसांड होत असुन तातडीने स्वच्छतागृहे सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी करत बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना केली असुन सांगा डॉ . अशोक थोरात साहेब सोनोग्राफीसाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिलांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे?? असा सवाल केला आहे.

बीड जिल्हा रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) तपासणी व उपचारासाठी रोज एक हजारांहुन आधिक रूग्णांची नोंद असते.सर्व उपचार व तपासण्या मोफत केल्यापासुन रूग्ण संख्येत कमालीची वाढ झाली आहे.आंतररुग्ण ( आयपीडी) विभागात देखील ४०० च्या घरात रुग्ण उपचारासाठी दाखल असतात. या दोन्ही रूग्णांचे नातेवाईक आणि बाह्य रुग्ण विभागात तपासणीसाठी आलेले रुग्ण अशी जिल्हा रुग्णालयात राबता असलेल्या नागरिकांची संख्या हजारोंच्या घरात आहे.मात्र रूग्णालयाच्या आवारात एकही सार्वजनिक स्वच्छता नाही याचा फटका नातेवाईक महिला व महिला रूग्णांना बसतो.

सोनोग्राफीसाठी ताटकळत बसलेल्या गर्भवती महिलांची हेळसांड

महिला रूग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून सोनोग्राफीसाठीची तपासणी सुचवल्या नंतर व विशेषत: गर्भवती महिलांना हि तपासणी करण्यासाठी तासं तास ताटकळत थांबावे लागते. सोनोग्राफीकरणा-या तज्ञांची संख्या आणि एकच सोनोग्राफी असल्याने वेळ लागतो. एवढ्या वेळात नैसर्गिक विधीसाठी या महिलांनी जायचे कुठे?? ग्रामीण भागातील आलेल्या महिलांची विशेषत: हेळसांड होत आहे.

सार्वजनिक स्वच्छतागृह लवकरच सुरू करण्यात येईल :- डॉ.अशोक थोरात ; जिल्हा शल्यचिकित्सक बीड

सदर स्वच्छतागृह लवकरच सुरू करण्यात



येईल.तसेच माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नवीन बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह आहे.त्याचा वापर सुरू करून स्वच्छतागृहाची अडचण सोडवण्यात येईल असे बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी डॉ.गणेश ढवळे यांना आश्वासन दिले.

# शिरूर शहरातील मेन रस्त्यावरील धूळ घेते शिरूरकरांचा जीव

## धुळीच्या प्रदूषणामुळे जिवंन धोक्यात शासकीय यंत्रणेला जागा करण्यासाठी २६ जानेवारी आंदोलन शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर

प्रतिनिधी ।आरंभ शिरूर का

दिनांक १९ शिरूर शहरातील मेन रस्ता महत्त्वाचा व राजकीय दूरदृष्टी कोणातून महत्त्वाचा असलेला शिरूर शहरातील सध्या धुळीच्या प्रदूषणाने चांगलाच गिळकृत झाला आहे शहरातील हवा जनधुळीने व्यापली आहे आणि यामुळे व्यापाऱ्यांना ग्राहकांना व स्थानिक नागरिकांना वेगवेगळ्या आरोग्यांच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे या रस्त्यावरील धुळीच्या समस्या नेहमी चर्चेत असतानाही शासकीय यंत्रणा यावर ठोस उपयोजना करण्यात अपयशी ठरली आहे शिरूर शहरांमधील मुख्य बाजारपेठेतील असलेल्या रस्त्याची बिघडलेली अवस्थेने धुळीचे प्रमाण वाढले आहे या धुळीने विविध आजारांचे प्रमाण वाढले असून श्वसन मार्गाच्या समस्या दमा घसा खवखवणे डोळ्यांची जळजळ आणि फुफुसांच्या विकारांचा धोका सानिकावर रंगवत आहे शिरूर शहर हे शहर काळ्या मातीमध्ये बसलेले असल्यामुळे धुळीचे प्रमाण जास्त आहे पांढरा फुफाटा भुरकट तसेच पांढरी माती जास्त प्रमाणात आहे मुख्य बाजारपेठेत रस्त्यावरून भरधाव वाहने धावतात त्यामागे वारा सुटतो आणि त्या धुळीचे कण हवेत मिसळतात या धुळीच्या कानाने नुसते जीवन असाही केले आहे शहरातील सर्वजण आबला वृद्ध व्यापारी वर्ग शाळेकरी मुले धुळीच्या त्रासामुळे बाधित झाले आहेत पदाचारी आणि वाहन चालकांना रस्त्यावर चालणे खूप कठीण बनले आहे व्यापारी दुकाने व हॉटेल धुळीमुळे तडाख्याला आली आहेत आणि ग्राहकांची संख्या घठली आहे किराणा दुकानात धुळ शिरल्याने मालाची गोडी आणि गुणवत्ता नष्ट होत आहे ज्यावेळी निवडणुकांचा प्रचार असतो तेव्हा पुढारी आश्वासन देतात अनेक निवडणुका या धुळीच्या समस्यावर भाष्य केले गेले आहे परंतु त्यानंतर त्यावर कारवाई होत नाही पुढार्यांना फक्त प्रचारासाठीच गावात येण्याची आठवण असते पण त्यांच्या आश्वासनाचा काहीच उपयोग ठरत नाही यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे याच पार्श्वभूमीवर शिरूर शहरातील रस्ते पाणी विकास व शिरूर शहरातील नागरिकांच्या मेन रस्त्यामुळे बिघडलेल्या परिस्थितीमुळे शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिरूर तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी या समस्यासाठी वारंवार जिल्हाधिकारी साहेबांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे व या रस्त्याची दुरुस्ती करणे डिव्हायडर करणे डांबरीकरण करणे व्यवस्थित या रस्त्याचं बांधकाम करणे यासाठी खूप वेळा निदर्शने केली आहेत व या शहरातील नागरिकांच्या त्यांचा जीव धोक्यात आहे तेव्हा या धुळीचा प्रदूषणावर त्वरित उपयोजना कराव्यात आमच्या जीवाशी खेळण्याचे काम थांबवा अशी भावनिक मागणी शिवसेनेच्या नेत्यांकडे नागरिक करत आहेत शिरूर येथील लोकांची अवस्था इतकी गंभीर झाली आहे की आता त्यांना जिल्हाधिकारी यांच्याकडून मदतीची आशा आहे आज निवेदन देऊन येत्या २६ तारखेला शिरूर शहरातील जिजामाता चौक या मेन चौकामध्ये मधोमध निदर्शन आंदोलन शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने शिरूर शहरातील नागरिकांच्या हितासाठी स्वच्छतेसाठी आंदोलन करण्यात येणार आहे

### धुळीच्या आजारांचे दुष्परिणाम

धुळीचा प्रदूषण श्वासनमार्गाच्या विकारांना जन्म देत आहे लोकांना दमा घसा खवखवणे डोळ्यात जळजळ आणि सतत सर्दी होण्याचे त्रास होतात विशेष धुळीमुळे विविध प्रकारांचे जंतू आणि किटानू शरीरात प्रवेश करतात ज्यामुळे लोक विविध रोगांना सामोरे जात आहेत शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व सर्व शिवसैनिक




### शिरूर शहरातील रस्ता हा महत्त्वाचा मुद्दा

धुळीच्या मुख्य कारणांपैकी एक म्हणजे शिरूर शहरातील रस्त्यांची वाईट अवस्था व त्यावरून होत असलेले वाहतूक मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरून भरधाव पद्धतीने वाहने पळवली जातात त्यामुळे धूळ मोठ्या प्रमाणात उडते गेल्या काही दिवसापूर्वी मुख्य बाजारपेठेतील सिमेंट रस्ता करण्यात आला मात्र त्यावरील सिमेंटचा फुफाटा अति प्रमाणात उडत आहे तसेच शिरूर शहरातील राख यांच्या दुकानापासून ते सिमेंट रस्ता अतिशय निकृष्ट दर्जेचा झालेला आहे अवघ्या वर्षभरातच या रस्त्याचे तीन तेरा वाजले आहेत त्यानंतर रस्त्याची पूर्वतस्थिती परत न करता तिथे धुळीचा साच तयार झाला आहे या धुळीच्या कणाणी सर्वोच्च क्षेत्रांना प्रभावित केले आहे

# हॉटेलमध्ये टेबलावर उरलेल्या कांदा, चटणीचं पुढे काय होतं?

हॉटेलमध्ये जाऊन आयत्या जेवणावर ताव मारणं हे अनेकांच्याच आवडीचं काम. तुम्हाला हवा तो पदार्थ, हव्या त्या चवीमध्ये तुमच्यापुढं आणून देणारी कैक पद्धतींची हॉटेलं मागील काही वर्षांमध्ये सुरू झाली असावीत. खास प्रसंग किंवा अगदी काहीच खास नसलं तरीही काही मंडळी हॉटेलची वाट धरतात.

हॉटेलमध्ये गेलं असता तिथं काही गोष्टी अगदी सवयीप्रमाणं टेबलावर आणून ठेवल्या जातात. यामध्ये सुरुवातीला दिलं जाणारं पाणी असो किंवा जेवणासोबत दिला जाणारा लालसर रंगाचा व्हिनेगर मध्ये डुंबलेला, किंवा कधी चिरून दिलेला कांदा, सॅलड, लोणची आणि चटण्या असो. महत्वाची बाब म्हणजे सहसा ऑर्डर केलेल्या प्रत्येक पदार्थाचा खवैय्यांकडून फडशा पाडला जातो. पण, टेबलावर इथून तिथं घुटमळणारा कांदा आणि चटण्या, लोणची मात्र तिथंच रेंगाळत राहतात. कधीकधी त्यांच्याकडे पाहिलंही जात नाही. मग या गोष्टींचं पुढे काय होतं? याच प्रश्नाचं उत्तर देणारा एक व्हिडीओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे.




एका इन्स्टाग्राम अकाऊंटवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला असून, 'अमृतसर हवेली' या लोकप्रिय हॉटेल चेनमधील हा व्हिडीओ असल्याचं सांगितलं जात आहे. हॉटेलच्या हैदराबाद शाखेतील या व्हिडीओमध्ये एका ग्राहकाला देण्यात आलेलं कांदा आणि लोणचं तसंच पुढे दुसऱ्या ग्राहकाच्या टेबलवर दिलं जात असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. आम्ही फक्त व्हिनेगर असणारे कांदेच इतरांना पुन्हापुन्हा देतो, कोणी म्हणे आम्ही असं करत नाही अशी अजिबातच साधर्म्य नसणारी उत्तरं मिळाल्यानं इथं ग्राहकांचाही संताप अनावर होताना दिसत आहे. महागड्या आणि नामांकित हॉटेलांमध्ये अनेकदा जेवणासाठी मोठी रक्कम मोजली जाते. पण, याच हॉटेलांमध्ये मिळणारं जेवण आणि तिथं असणारे पदार्थ खरंच किती स्वच्छ आणि खाण्यायोग्य असतात हाच प्रश्न आता पुन्हापुन्हा उपस्थित होत आहे.

सोशल मीडियावर हा व्हिडीओ सध्या प्रचंड व्हायरल होत असून, नेटकरी हा व्हिडीओ पाहून विचित्र प्रतिक्रिया देत आहेत. काहींनी तर, 'आता हॉटेलमध्ये जातानाही दोनदा विचार करावा लागणार' अशा प्रतिक्रियासुद्धा दिल्या आहेत.

# इंधन बचत मासीक कार्यक्रमाचा धारूर आगारात शुभारंभ उत्कृष्ट चालकाचा सत्कार

धारूर / प्रतिनिधि

धारूर येथील एस टी आगारात इंधन बचत मासीक कार्यक्रमाचा शुभाऱ्भ उत्साहात करण्यात आला यावेळी इंधन बचती मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या चालकाचा सत्कार करून त्याचे कौतूक करण्यात आले. इंधन बचती बद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.धारूर आगारा मध्ये इंधन बचत मासीक कार्यक्रम १६ ते १५ फेब्रुवारी चां शुभाऱ्भ कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणूनसहायक वाहतूक निरीक्षक ज्ञानेश्वर काब्ळे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगारप्रमुख नवनाथ चौरे तर प्रमुख पाहुणे म्हणूण सेवानिवृत्त अधिकारीभारत कोमटवार आय टी आय चे प्रशिक्षक नंदकिशोर मुळे, शेख जे यु आदी उपस्थीत होते यावेळी इंधन बचती मध्ये उत्कृष्ट काम करणारे आगारातील चालक चालक आण्णा शिद्रे, सुनिल सिरसट,गुजर कराड़े, आण्णा मुळे, भालेराव आदीचा



सत्कार करून त्याचे कार्याचा गौरव करण्यत आला

या वेळी मार्गदर्शन करताना सहायक वाहतूक निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे याऩी सध्या रस्ता सुरक्षा अभियान सुरूअसुन पाऱ्पारीक अपारंपारीक दोन इंधन प्रकार असून इध़न बचत मध्ये देशाच हित आहे. इध़न बचती साठी घ्यायचे दक्षता साग़ीतल्या इंधन बचत कुठे होऊ शकते रस्ता सुरक्षितता पाळा अपघातात मृत्युची संख्या जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर चालकाचे चुकी मुळ अपघात होतात स्पिड पाळा मद्यप्राशान करून वाहन चालवू नका वाहण चालवण्याचे नियम पाळा असे अवाहण केले तर

अध्यक्षीयसमारोप आगारप्रमुख नवनाथ चौरे याऩी नियम पाळले व सुरक्षीत चाललो तर इंधन किती वाचवू शकतो पुढचे पिढी साठी इध़न वाचव जबाबदारी पर्यावरण सुरक्षितता वातावरण संतूलन साभ़ाळणे आपल प्रत्येकाच काम चालकच समाजाला दिशा देऊ शकतो नैतीक जिम्मेदारी साभ़ाळली तर या यध्ये निश्चीत यश मिळेल असे साग़ीतले.

नंदकिशोर मोरे याऩी इंधन वेगवेगळे प्रकार त्यांचे बचती चे उपाय ब्रेकदबने, स्पीड, ए सी चा अनावश्यक वापर त्याच़ी देखभाल वेळेला करणे पर्यावरणातील प्रदूषण टाळण्यास मदतकरते असे साग़ीतले सेवा निवृत्त एस टी चे अधीकारी भारत कोमटवार याऩी इध़न बचती साठी काय केले पाहीजे उपाय केले पाहीजेत हे साग़ीतले शांत डोक व स्वभाव महत्वाचा सुरक्षीतता पाळा वाहतुकेचे नियम पाळा गाडीचा अभ्यास करा कायम इंधन बचत पाळा विचार बदला आयुष्य बदलेल असे साग़ीतले तर यांञीक विभाग प्रमुख विलास शिद्रे राष्ट्रीय कार्यक्रम आहे सर्वानी पर्यावरण सतूलना साठी इध़न वाचवणे गरजेचे आहे असे साग़ीतले यावैळी आगारातील सर्व कर्मचारी मोठ्या सख़्येने उपस्थीत होते.

# घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार मोठया शिताफीने पोलिसांनी पकडला

## बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; पाच घरफोड्या केल्याचे उघड

गेवराई । प्रतिनिधी

**गेवराई : अंबाजोगाई उपविभागातील दाखल होणाऱ्या चोऱ्या,घरफोडयाचा संमातर तपास करुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हयातील गेला माल हस्तगत करणे बाबत आदेश वरीष्टांनी दिल्याने गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती काढुन कुख्यात सराईत दरोडेखोर हा त्याने चोरलेले सोने विकण्यासाठी परळी मध्ये येत असल्याची माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सापळा रचुन मोठया शिताफीने कुख्यात दरोडेखोर मोहन दौलत मुंडे, रा.क्रांती नगर, अंबाजोगाई यास अशोक नगर कमानीजवळ झडप मारुन पकडले. त्याचे जवळ विकण्यासाठी आनलेले सोन्याचे दागीणे आढळुन आले त्यास परळी व अंबाजोगाई येथे झालेल्या घरफोडी बाबत चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली**

असता त्यांने ०५ घरफोडया केल्याचे प्राथमिक चौकशीअंती निष्पन्न झाले असुन त्यांनी पाच दिवसा घरफोडया केल्याचे कबुल केले आहे, त्याचे ताब्यातुन पोलीस ठाणे परळी ग्रामीणचे ०२ गुन्हे, पोलीस ठाणे परळी शहर ०१ गुन्हा, पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण ०१ व पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर ०१ असे असुन ०५ दिवसा घरफोडीचे गुन्हे उघडकीस आनले आहे. त्याचे ताब्यातुन एकुण १२२ ग्रॅम सोने जवळपास आजचे बाजारभाव ९,००,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आला आहे. सदरील आरोपी हा दारु पिण्याचे व जुगार खेळण्याचे सवईचा असुन तो दारुच्या नशेत बंद घर पाहुन कुलुप तोडुन आत मध्ये प्रवेश करुन सोने, नगदी चोरुन नेतो व मिळालेल्या पैशातुन दारु पितो व जुगार खेळतो. आरोपी मोहन दौलत मुंडे याचेवर दिवसा घरफोडीचे अनेक गुन्हे दाखल आहेत.तो पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

सदरील कारवाई हि श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, बाळकृष्ण जायभाय, विकास राठोड, राजु पठाण, नितीन वडमारे, सचिन आंधळे, तुषार गायकवाड, विकी सुरवसे, देविदास जमदाडे यांनी केली आहे.



सुतळे, गायकवाड, काबळे, वडमारे, सुरवसे हे कर्मचारी गुन्हे शाखेची मान उंचावणारे कर्मचारी आहेत यांच्या कडून अनेक गुन्हेगारांना धडा शिकविण्याचे धाडस आहे सिंघम व दबंग कारवाई करण्यामध्ये हे कर्मचारी सदैव पुढे असतात गुन्हेगारांच्या पाठीमागे व सापळा रचून सळो की पळो कारणाऱ्या या पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पाठबळ देणे गरजेचे आहे अशा कर्मचाऱ्यांमुळे बीडची पोलीस यंत्रणा सुधारण्यास मदत होईल या अगोदर सुद्धा या कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवाची परवा न करता आणि गुन्हेगारांना धडा शिकवलेला आहे आता फक्त बीड जिल्ह्यातील अनेक भागांमधून गुन्हेगारांना संपविण्यासाठी नवनीत कामत यांना चांगल्या बीड जिल्ह्यातील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये यंत्रणा गरजेचे आहे

## पीएम किसान योजनेच्या नियमात बदल होणार? उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं मोठं वक्तव्य

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पीएम किसान योजनेत पारदर्शकता यायला हवी. तसेच खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा. यासाठी केंद्र सरकारने या योजनेच्या नियमात बदल केला असेल असं मला वाटतं असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. त्यामुळं आता केंद्र सरकारनं नेमका पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेत कोणता बदल केला असेल? अशी चर्चा सर्वत्र सुरु आहे.



पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपये मिळणार

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. ही मदत ४ महिन्याला २००० रुपयांचा हप्ता या प्रमाणे दिली जाते. आत्तापर्यंत शेतकऱ्यांना जीएम किसान योजनेचे १८ हप्ते मिळाले आहेत. १९ वा हप्ता कधी मिळणार अशी देखील मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. लवकरच म्हणजे पुढच्या फेब्रुवारी महिन्यात पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता मिळणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत कोणताही माहिती मिळाली नाही. मात्र, अशातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्वाचं वक्तव्य केलं आहे. केंद्र सरकारने या योजनेच्या नियमात बदल केला असेल असं मला वाटतं असे एकनाथ शिंदे म्हणाले.

विश्वासाने सर्व लोक प्रवेश करत आहेत

निफाड, दिंडोरी, नाशिकच्या पदाधिकाऱ्यांसह नागपूरचे दुशंतचे चतुरवेदी ( माजी आमदार ) यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. या सर्वांचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केलं. संपूर्ण राज्यातून शिवसेनेत प्रवेशाचा ओढा सुरु आहे. बाळासाहेबांचे विचार घेऊन प्रवेश केला जातोय असेही शिंदे म्हणाले. विधासभेत ६० आमदार देऊन जनतेने शिक्कामोर्तब केला आहे. विश्वासाने सर्व लोक येत आहेत असेही शिंदे म्हणाले. कल्याणकारी आणि लोकांभिमुख योजनेची पोचपावती आम्हाला मिळतेय. राज्यबाहेरील कार्यकर्ते, पदाधिकारी पक्षात येत आहेत असे शिंदे म्हणाले.

शिवसेना मोठ्या वेगाने पुढे जात आहे

शिवसेना मोठ्या वेगाने पुढे जातं आहे. राज्यात जिथे जिथे विकासाची आवशकता आहे तिथे आम्ही विकास करु या विशस्वासाने लोक येत आहेत असे शिंदे म्हणाले. आजचं स्वामीत्व योजना जाहीर केली आहे. सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचं काम मोदी करत आहेत. आज ६५ लाख लोकांना लाभ मिळाला असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. पीएम किसान योजनेत पारदर्शकता यायला हवी, खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा, प्रत्येक शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा यासाठी केंद्राने नियमात बदल केला असेल असं मला वाटत असेही शिंदे म्हणाले. विचारांशी तडजोड आणि बाळासाहेबांचे विचार सोडल्याने उबाठाची लोक येत आहेत. जिथे जिथे स्थानिक स्वराज्य संस्थांनाच्या निवडणुका आहेत तिथे तिथे आम्ही महायुती म्हणून निवडणुका लढवणार आहोत. काही ठिकाणी परिस्थिती नुसार कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेतला जाईल असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## तांदळाच्या दरात ५०० रुपयांची घसरण!

### इथेनॉलसाठी तांदळाची मोठ्या प्रमाणावर खरेदी

केंद्र सरकारने नवीन वर्ष २०२५-२६ साठी इथेनॉल मिश्रणाचे २० टक्के लक्ष्य ठेवले आहे. हे साध्य करण्यासाठी तांदूळ, मका तसेच इतर भरड धान्यांचा वापर केला जात आहे. तर, उसापासून देखील इथेनॉल तयार केले जात आहे. आता इथेनॉलचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मोठा निर्णय घेत केंद्राने ऋउख कडून डिस्टिलरींना विकल्या जाणाऱ्या तांदळाच्या किमतीत प्रति क्विंटल ५५० रुपयांची कपात केली आहे. डिस्टिलरीज कमी किमतीत २४ लाख मेट्रिक टन तांदूळ खरेदी करू शकतील. या निर्णयानंतर इथेनॉल निर्मितीचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

डिस्टिलरीज १२ लाख टन तांदूळ खरेदी करू शकतील

अन्न मंत्रालयाने २०२४-२५ या कालावधीत ऋउख तांदूळ सुमारे ११० कोटी लिटर इथेनॉलसाठी वापरावे असे आदेश दिले आहेत. यासाठी केंद्र सरकारने राज्ये आणि इथेनॉल उत्पादकांसाठी खुल्या बाजार विक्री योजनेअंतर्गत एफसीआय तांदळाची राखीव किंमत ५५० रुपये प्रति क्विंटलने कमी करून २२५० रुपये केली. अन्न मंत्रालयाच्या आदेशानुसार, राज्य सरकारे आणि सरकारी कंपन्या १२ लाख टनांपर्यंत खरेदी करू शकतात, तर इथेनॉल डिस्टिलरींना २४ लाख टनांपर्यंत कमी दराने खरेदी करण्याची परवानगी आहे.

यापूर्वी तांदळाची राखीव किंमत २८०० रुपये

राज्ये आणि डिस्टिलरीजसाठी एफसीआयची पूर्वीची राखीव किंमत २८०० रुपये प्रति क्विंटल होती. यामध्ये प्रतिक्विंटल ५५० रुपयांनी भावात कपात करण्यात आली असून, त्यानंतर आता तांदूळ २२५० रुपयांनी मिळू शकेल. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया , साप्ताहिक ई-लिलावाद्वारे तांदूळ साठा व्यवस्थापित करणारी संस्था, हे सुधारित धोरण ३० जून २०२५ पर्यंत लागू करेल.



खासगी व्यापाऱ्यांच्या किमतीत बदल नाही

केंद्राच्या निर्णयानुसार, खासगी व्यापारी आणि सहकारी संस्था प्रति क्विंटल २८०० रुपयाने तांदळाची विक्री करतील. तर छ-ऋएऊ छउउऋआणि केंद्रीय भांडार सारख्या केंद्रीय सहकारी संस्थांनी 'भारत' ब्रँड अंतर्गत विक्री केल्यास २४०० रुपये प्रति क्विंटल द्यावे लागतील. जचडड धोरणाचे उद्दिष्ट अन्न सुरक्षा वाढवणे आणि विविध भागधारकांना तांदळाचे कार्यक्षम वितरण सुनिश्चित करणे हे आहे, असे एका निवेदनात म्हटले आहे.

उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उत्पादन वाढवण्यावर भर

इथेनॉल पुरवठा वर्ष (नोव्हेंबर-ऑक्टोबर) २०२५-२६ साठी २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी, देशाला २०२३-२४ मध्ये १,००० कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन करावे लागेल, जे ५४५ कोटी लिटर होते. एका अधिकृत नोंदीनुसार, २०२३-२४ मध्ये एड्ध दरम्यान पेट्रोलशी १४.६ टक्के मिश्रण साध्य झाले आहे. गुळापासून इथेनॉल बनवण्याची क्षमता ९४१कोटी लिटर आणि धान्यावर आधारित डिस्टिलरीजची क्षमता ७४४ कोटी लिटर इथेनॉल असल्याचे सांगण्यात आले.

## आरटीई प्रवेश फी प्रतिपूर्तीसाठी ४५ कोटींचा निधी आरटीई शुल्कसाठी ४५ कोटींचा निधी

### निकषानुसार निधी वाटप व्हावा - मनोज जाधव

बीड (प्रतिनिधी)बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गतच्या (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. शासनाकडून आरटीई प्रवेश फी प्रतिपूर्तीसाठी होत असलेला विलंब आणि या विलंबामुळे शाळांचा आरटीई प्रवेशाबाबत निरुत्साह पहावयास मिळत होता मात्र या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया राबविलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना शुल्क प्रतिपूर्ती देण्यासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून मान्यता मिळाली आहे.

आरटीईअंतर्गत वंचित व दुर्बल घटकांतील मुलांसाठी मोफत प्रवेश व शिक्षण देण्यात येते. प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक




शुल्काची प्रतिपूर्ती राज्य शासनामार्फत करण्याबाबतची तरतूद केली आहे. प्राथमिक शिक्षण संचालक यांनी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती शासनास केली होती. २०२४-२५ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीसाठी १७३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला आहे. त्यातील ६९ कोटी २० लाख रुपयांचा निधी ५ सप्टेंबर २०२४ रोजी वितरित केला असून, आता ४५ कोटी निधी मंजूर केला आहे. सन २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या वर्षांच्या प्रतिपूर्तीसाठी प्राधान्याने निधी वितरित होणार आहे.

निकषानुसार निधी वाटप व्हावा - मनोज जाधव

आरटीई प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी शासनाने निधी मंजूर केला आहे. निधी लवकरच जिल्हा निहाय वितरित केला जाईल त्यानंतर तो शाळांना वितरित केला जाईल हा निधी शासन निकषाप्रमाणे वाटप होणे गरजेचे आहे. मात्र यात काही संस्था चालक अधिकाऱ्यांवर दबाव आणून नियमबाह्य निधी लाटण्याच्या तयारीत आहेत. यामुळे विशेषतः छोट्या संस्था आणि ग्रामीण भागातील संस्था यांच्यावर अन्याय होत आहे. तेव्हा शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमानुसारच हा निधी वाटप करावा अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

## संतोष देशमुख हत्या प्रकरण पोलिसांनी कसे हाताळले याची समितीकडून चौकशी

बीड /प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्या. एम. एल. ताहलियानी यांची एकसदस्यीय चौकशी समिती शासनाने नियुक्त केली आहे. या समितीच्या चौकशी फेऱ्यात बीड पोलिसही आले आहेत. हे प्रकरण बीड पोलिसांनी कशी प्रकारे हाताळले याची चौकशी समितीकडून केली जाणार आहे.

दोन दिवसांपूर्वी निवृत्त न्या. ताहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एकसदस्यीय चौकशी समितीची नियुक्ती झाली आहे. संपूर्ण घटनाक्रम, त्याची कारणे आणि परिणाम याचा अभ्यास, या घटनेसाठी कोणती व्यक्ती, संस्था प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जबाबदार होती याची तपासणी, कायदा, सुव्यवस्था राखण्यात पोलिसांचे नियोजन योग्य होते का, परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांनी उचललेली पावले योग्य होती का, या मुद्द्यांवर जबाबदारी निश्चित करणे, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आपत्कालीन व दीर्घकालीन उपाय सूचवणे या मुद्द्यांवर समिती चौकशी करणार आहे.

कागदपत्रे जप्तीचा अधिकार

समितीला कोणत्याही जागेत, इमारतीत प्रवेश, कुणालाही चौकशीला बोलावणे, कोणतेही कागदपत्रे जप्त करण्याचा अधिकार समितीला असेल, बीड हे समितीचे मुख्यालय असेल. समितीसाठी मनुष्यबळ, वाहन, भत्ते याबाबत स्वतंत्र आदेश काढला जाणार आहे. तीन ते सहा महिन्यांत समिती अहवाल देईल, असेही सांगण्यात आले आहे. ६ आरोपींना आज केज न्यायालयात हजर करणार: हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, सिद्धार्थ सोनवणे, प्रतीक घुले, महेश केदार, जयराम चाटे यांना शनिवारी केजच्या न्यायालयात हजर केले जाणार आहे.

वाल्मीक दिंडोरी आश्रमात लपला होता- तृप्ती देसाई२ कोटींच्या खंडणी प्रकरणात पोलिस वाल्मीक कराडचा शोध घेत होते तेव्हा तो आपला सहकारी विष्णू चाटेसह नाशिकच्या दिंडोरी येथील आश्रमात लपल्याचा आरोप भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला आहे. दिंडोरी येथील आश्रमात वाल्मीक कराड व विष्णू चाटे १५ व १६ डिसेंबर रोजी मुक्कामाला होते. त्या वेळी खंडणी प्रकरणात पोलिस त्यांचा शोध घेत होते. ते दोन दिवस आश्रमात राहिल्यानंतर १७ डिसेंबर रोजी पुढे प्रवासाला निघून गेले.



## पालकमंत्र्यांची यादी जाहीर,अजित पवार बीडचे तर पंकजा मुंडे जालन्याचे पालकमंत्री

### बीडचा कारभार सांभाळण्यासाठी अजित पवारांनी घेतला मोठा निर्णय!

प्रतिनिधी | बीड

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संताप व्यक्त केला जात आहे. याच संतापाचा फटका मंत्री धनंजय मुंडे यांना बसला आहे. हे प्रकरण उजेडाच येण्याधी धनंजय मुंडे हेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असतील, असा विश्वास व्यक्त केला जात होता. मात्र पाकलमंत्र्यांच्या यादीत धनंजय मुंडे यांचे नाव नसून त्यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. आता बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खुद्द त्यांच्याकडेच ठेवून घेतलं आहे. अजित पवार यांनी घेतला मोठा निर्णय राज्य सरकारने नुकतेच राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली आहे. एकीकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद धनंजय मुंडे यांच्याकडेच येईल, असा कयास लावला जात होता. मात्र संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा त्यांना फटका बसला आहे. पालकमंत्रिपदाच्या यादीतून त्यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. आता बीड जिल्ह्याचा कारभार स्वत: अजित पवार पाहणार आहेत. त्यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद स्वत:कडे ठेवलंय. तसेच बीड जिल्ह्यासोबतच ते पुणे जिल्ह्याचेही पालकमंत्री असणार आहेत.

### सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची यादी

१. गडचिरोली - देवेंद्र फडणवीस २. ठाणे - एकनाथ शिंदे ३. मुंबई शहर - एकनाथ शिंदे ४. पुणे - अजित पवार ५. बीड - अजित पवार ६. नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे ७. अमरावती चंद्रशेखर बावनकुळे ८. अहमदनगर - राधाकृष्ण विखे पाटील ९. वाशिम - हसन मुश्रीफ१०. सांगली - चंद्रकांत पाटील ११. नाशिक - गिरीश महाजन १२. पालघर - गणेश नाईक १३. जळगाव -गुलाबराव पाटील १४. यवतमाळ - संजय राठोड १५. मुंबई उपनगर - आशिष शेलार तर सहपालकमंत्री - मंगलप्रभात लोढा १६. रत्नागिरी - उदय सामंत १७. धुळे - जयकुमार रावल १८. जालना - पंकजा मुंडे १९. नांदेड - अतुल सावे २०. चंद्रपूर - अशोक उईके २१.सातारा - शंभूराज देसाई २२. रायगड - आदिती तटकरे २३.लातूर - शिवेंद्रराजे भोसले २४. नंदूरबार - माणिकराव कोकाटे २५.सोलापूर - जयकुमार गोरे २६. हिंगोली - नरहरी झिरवाळ २७. भंडारा - संजय सावकारे २८. छत्रपती संभाजीनगर - संजय शिरसाट २९. धाराशिव - प्रताप सरनाईक ३०. बुलढाणा - मकरंद जाधव ३१. सिंधुदुर्ग - नितेश राणे ३२. अकोला - आकाश फुंडकर ३३. गोंदिया -बाबासाहेब पाटील ३४. कोल्हापूर - प्रकाश आबिटकर तर सह पालकमंत्री - माधुरी मिसाळ ३५. वर्धा - पंकज भोयर ३६.परभणी - मेघना बोर्डिकर

### पंकजा मुंडेंकडे जालना जिल्हा

- संतोष देशमुख हत्या प्रकरण समोर आल्यानंतर बीड जिल्ह्याचा कारभार अजित पवार यांनी स्वत:कडे घ्यावा तसेच येथील कायदा आणि सुव्यस्थेचा प्रश्न हाताळावा, अशी मागणी केली जात होती. नागरिकांची हीच भावना लक्षात घेऊन धनंजय मुंडे यांना वगळून अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद स्वत:कडे ठेवलंय. धनंजय मुंडे यांना पालकमंत्रिपद न मिळाल्यास ही जबाबदारी पंकजा मुंडे यांना दिली जाऊ शकते, असेही म्हटले जात होते. मात्र त्यांना देखील बीड जिल्ह्याऐवजी जालना जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले आहे.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT